महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या आस्थापनेवरील उप कार्यकारी अधिकारी या पदाच्या पदनामात बदल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : इबांका - २०१६/प्र.क्र.२१०/कामगार- ७,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २५ जुलै, २०१९.

संदर्भ :- १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक इमारत - २०१२/प्र.क्र.१६१/कामगार-७ अ, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२.

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक इमारत - २०१४/प्र.क्र.१५७/कामगार-७, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८.

३) सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ यांचे पत्र जा.क्र./मइवइबांकाकमं/१०२५/२०१९, दिनांक ७ जून, २०१९

प्रस्तावना:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी या पदाच्या पदनामात संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयाद्वारे उप कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) असा बदल करण्यात आला आहे. तथापि, शासन निर्णयामध्ये नमूद उप कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) हे पद जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) या पदाचा लगतचे कनिष्ठ पद असल्याने उप कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) या पदाच्या पदनामामध्ये “उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ)” असा बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या आस्थापनेवरील उप कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) या पदाचे पदनाम “**उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) ”** असे करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७२५११५५५६२११० असा आहे. तसेच, सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SHASHANK MADHAV SATHE

Digitally signed by SHASHANK MADHAV SATHE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519
f39893078c30b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb75
9493176e40002b178, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR ,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHASHANK MADHAV SATHE
Date: 2019.07.25 12:04:45 +05'30'

(श. मा. साठे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
४) मा.विरोधी पक्ष नेता (विधानसभा/ विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ,मुंबई,
५) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
६) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
७) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई,
८) सर्व सन्मा. विधानसभा/ विधानपरिषद सदस्य,
९) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई,
१०) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१४) कामगार आयुक्त, मुंबई, (१५प्रती)
१५) उप सचिव (कामगार-७),यांचे स्वीय सहाय्यक,
१६) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
१७) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
१८) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,
१९) सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई,
२०) निवडनस्ती (कामगार-७).